# प्रसिद्ध अभिनेते मुकेश खन्ना यांच्या हस्ते लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन




**लोणावळा :** लोणावळा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल(लिफ़्फी). या १ ते ३ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेते व चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अभिनेते मुकेश खन्ना यांच्या हस्ते झाले,यावेळी सुशीलकुमार अग्रवाल–अल्ट्रा मीडिया ऍण्ड एंटरटेनमेंट प्रा.ली चे सीईओ त्यासोबत अभिनेते राजेश पेडणेकर,निर्माता जितेंद्र मिश्रा,अभिनेते कवलजीत सिंग,अभिनेते,लेखक निर्माते विवेक वासवानी आणि आयोजक माधव तोडी उपस्थित होते.

संवाद आणि संपर्क या सामाजिक संस्थांच्या मुलांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागत समारंभानंतर संवाद आणि संपर्क संस्थेच्या मुलांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला. या तीन दिवसीय चित्रपट महोत्सवात ३२ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

याठिकाणी दाखविण्यात येणाऱ्या काही सुप्रसिद्ध चित्रपटांमध्ये समावेश आहे– हम साथ साथ है, हम आपके है कौन, आय एम कलाम, अंदाज अपना अपना, जलपरी – द डेझर्ट मरमैड, स्वर्ग, छोटा सिपाही, रसेल मॅडनेस, मंकी अप, द गोल, माय लकी एलिफंट आणि इतर अनेक.